# रुंजी



डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे

# रुंजी

## डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# रुंजी

लेखक : डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे
फ़ोन – ९४२३८६५४५८

पत्ता : द्वारा -अंकुर क्लिनिक व मॅटर्निटी हॉस्पिटल,
११८७, रामडोह आळी,रथाशेजारी, वाई जि. सातारा ४१२८०३
ईमेल - drsunildeshpande@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
**e**sahity@gmail.com
प्रकाशन: २७ नोव्हेंबर २०२१
(शनिवार, कार्तिक कृ अष्टमी शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



' कविता ' ह्या तीन अक्षरी शब्दांची जादू मनावर नेमकी कधी राज्य करू लागली, हे नक्की नाही आठवत. पण ती झाली आईमुळे हे नक्की. (कै.) प्रा. मंगला रामकृष्ण देशपांडे. आई स्वतः उत्तम कवयित्री. मराठीची विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका. लहानपणापासून आईने स्वतः लिहिलेल्या अंगाई, कविता गाऊन झोपवणे, रंजन करणे ; ते करताना शब्दांचे वेगवेगळ्या संदर्भात, वेगवेगळे अर्थ, काना - वेलांटीने बदलणारे अर्थ, शब्दांच्या कोट्या आणि गंमती जमती सहज जाता जाता ऐकवणे, याने भाषेची गोडी लागली ती कायमची. लहान असताना एक कविता म्हणता येईल

अशा दोन ओळी मी लिहिल्या, मोठा भाऊ अंकुश याने त्यात आणखी काही ओळी सुचवल्या, ती माझी पहिली कविता. त्या वेळी ती कविता मुंबईच्या एका दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. तिच्याच वाचनाने मुंबई मराठी साहित्य संघात काव्यवाचन स्पर्धेत विशेष पारितोषिक मिळाले. इयत्ता पाचवी, वय वर्षे दहा. या घटनेने एक कॉन्फिडन्स मिळाला. पण त्यापुढे एक निश्चित केले की आपण जे काही लिहू, ते आपले स्वतःचे असेल. कुठल्याही शब्द वा शैलीची आपण आयात करायची नाही. ईतर भाषेतील रचनांचा स्वैर अनुवाद करण्याची ईच्छा हा मात्र अपवाद. त्यामुळे लिहायचो अधून मधून, पण फारसे कुणाला दाखवणे, वाचून दाखवणे व्हायचेच नाही. त्यामुळे एक व्हायचे की आपल्या लेखनाची गुणवत्ता कधी कळली नाही. लग्नानंतर डॉ. सौ. स्वातीने आग्रहाने काही कविता वृत्तपत्रे, मासिकांमधून, दिवाळी अंकांमधून पाठवण्यास सांगितल्या, अनेकदा त्या प्रसिद्धही झाल्या. काही कवी समेलनांमधून कविता वाचल्या. ईतर गद्य लेखन व्हायचे. आकाशवाणी मुंबई, रत्नागिरी आणि सातारा यांसाठी भरपूर लेखन, मुलाखती, प्रत्यक्ष सहभागाचे अनेक कार्यक्रम झाले, होतात. पण ते जास्त करून माझ्या पशुवैद्यकीय ज्ञानाधारित. आता मी वयाची पन्नाशी पूर्ण करत असताना डॉ. सौ. स्वातीने हा कवितासंग्रह व्हावा असा आग्रह धरला. माझ्या मातोश्री कै. प्रा. मंगला देशपांडे

यांचा कवितासंग्रह " सोबत " सन २०१७ साली प्रत्यक्षात येण्यात तिचेच प्रयत्न होते. डॉ. सौ. स्वाती, चि. अर्णव, चि. अवनी हे तिघेही हा कवितासंग्रह होण्याच्या दृष्टीने वेगाने प्रयत्न करू लागले. माझे मेहुणे विवेक सबनीस, वहिनी मंजिरी सबनीस, सासूबाई श्रीमती विजया श्रीकांत सबनीस यांचेही प्रोत्साहन लाभले. माझ्या गुरू डॉ. सौ. मधुमंजिरी गटणे यांनी कॉलेजकाळात लेखनास दिलेले प्रोत्साहन प्रेरक ठरले. लहानपणापासून लिहायला वेळोवेळी प्रोत्साहित करणारे माझे बाबा कै. प्रा. रामकृष्ण केशव देशपांडे, माझा जुळा भाऊ डॉ. अनिल देशपांडे, मोठे भाऊ रवी (अंकुश) देशपांडे, आनंद देशपांडे या सर्वांची माझी लेखणी ऋणी आहे.

मी विशेष उल्लेख करू इच्छितो सुप्रसिद्ध लेखक, कवी, गीतकार आणि ओजस्वी वक्ते प्रा. प्रवीण दवणे सर यांचा. त्यांनी थोडक्या पण सुंदर शब्दात दिलेल्या शुभेच्छा या कवितासंग्रहाला देखणेपण देऊन गेल्या आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान आणि सुनील सामंत यांचे हा कवितासंग्रह प्रकाशन करण्याबद्दल मनःपूर्वक आभार!

जसा भुंगा एखाद्या फुलाभोवती रुंजी घालत असतो, पुन्हा पुन्हा घिरट्या घालत असतो, तसेच लिहिणाऱ्याच्या मनात एखादा

विचार, एखादा शब्द, आणि त्यातून जन्मणारी एखादी कविता रुंजी घालत असते. एकदा हे शब्द कागदावर व्यवस्थित उतरले की ही रुंजी थांबते आणि पुन्हा काही काळानंतर आणखी काही विचार, शब्द आणि कदाचित पुन्हा एकदा एखादी कविता जन्मणे हा खेळ चालूच रहातो. यावरूनच सदर कवितासंग्रहाचे "रुंजी" नावाने बारसे केले आहे.

मी कोणी प्रथितयश कवी, लेखक नाही. हा माझा पहिलाच कवितासंग्रह आहे. आपण सर्व रसिक मराठी वाचक ह्या कवितासंग्रहाला "बोलू जाता बरळ, करिसी ते नीट" ह्या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे गोड मानून घ्याल ही अपेक्षा!

**डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे**
**२७/११/२०२१. वाई.**



**जिच्यामुळे कवितेची गोडी लागली त्या माझ्या आईस**


**( कवयित्री कै. प्रा. मंगला देशपांडे ),**

**जिच्यामुळे हा संग्रह प्रत्यक्षात येतो आहे त्या माझ्या पत्नीस**

**( डॉ. सौ. स्वाती देशपांडे )**

**आणि माझी प्रेमळ मुले चि. अर्णव आणि चि. अवनी यांना**

**समर्पित**



॥ श्री ॥

प्रवीण दवणे
ब-३०३, राजहंस, लुईसवाडी,
ठाणे (पश्चिम) ४०० ६०४.
दूरध्वनी: ०२२-२५८२३३३१
मो.: ९८२०३८९४१४
Email: dilkhulass@rediffmail.com

३।११।२१.

शुभेच्छा!

मनात रुंजी घालणाऱ्या कवितांना गुच्छ घेऊन डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे रसिकांच्या भेटीस येत आहेत, त्यांना शुभेच्छा देण्यासाठी एक कवी व काव्य-रसिक म्हणून हा शब्दप्रपंच!

कविता हे खरे तर पूर्ण वेळचे जगणे असते. त्या निर्मिती मागे संवेदनांची साधना असते. वाचन, मननाची एक गंभीर व दीर्घ वाटचाल असते. 'रुंजी' ह्या हौसेनं पण मनापासून केलेल्या कविता आहेत. 'चिंब सरीत भिजताना', मधील संवेदना, 'लहर' मधील उत्कट ओढ, 'श्रावण' लाघव मधील शब्दचित्रं 'ऊर्मी' मधील उत्स्फूर्त दाद द्यावी इतकी तरल आहे.

कवितेची उत्कट परंपरा व आशीर्वाद लाभलेल्या डॉ. सुनील यांना 'रुंजी' संग्रहाबद्दल शुभेच्छा!

आपला

# काव्यानुक्रम

१. रुंजी
२. रिक्त
३. चिंब सरीत भिजताना
४. हात
५. जीर्ण पाचोळा
६. लहर
७. नवे नाते
८. श्रावण
९. आई
१०. हो जागा
११. उर्मी
१२. कोण
१३. आताशा
१४. तेंव्हा आणि आता
१५. गीत एकट्याचे
१६. मी गेल्यावर
१८. अंतर
१९. तू
२०. सांज
२०. विसरलास तू
२१. आठवणींची जखम
२२. फूल
२३. छाटलेले पंख
२४. गरुड
२५. थंडी गुलाबी
२६. वेचलेले क्षण
२७. आरोपी
२८. हरवली वाट
२९. गाव
३०. महाबळेश्वर
३१. पाचगणी
३२. उध्वस्त
३३. फुलाचे मनोगत
३४. श्रावणात घन उष्ण निळा
३५. सावध
३६. नाते
३७. असे कसे होते
३८. तू - मी
३९. श्रावणसरी
४०. उतरले नभांचे ओझे
४१. सर सरतच नाही
४२. धृतराष्ट्र
४३. पडलो दूरदेशी
४४. झड शब्दांची
४५. भेट
४६. मन घनातले मेघ
४७. ते क्षण
४८. चाहूल
४९. फ्लॉपी
५०. पुन्हा बरसली सर
५१. अतृप्त

# रुंजी

रुंजी घालते मनात
तुझी रेखीव आकृती
शब्द तोकडे पडती
होते बिकटच स्थिती

रुंजी घालते मनात
तुझी देखणी ती छबी!
अनवट सौंदर्याची
मूर्ती समोर की उभी!

रुंजी घालते मनात
तुझ्या गालावरची खळी
नाही आवरला मोह
पुरता पडलो ग बळी

रुंजी घालते मनात
तुझे होकार नकार
नाही येत ग जाणता
तुझ्या मनीचे विचार

रुंजी घालते मनात
तुझे गळ्यात पडणे
खांदा करत ग ओला
धुसफूसत रडणे

रुंजी घालती मनात
तुझी गोड आश्वासने
घेतलेल्या आणाभाका
गोडगोड ती वचने

रुंजी घालती मनात
बेधुंद ते ग क्षण
बेभान, थाऱ्यावर
नव्हते तन मन

रुंजी घालती मनात
सूर गोड गळ्यातले
शब्द लाडिक नाजूक
धुंद जग प्रेमातले

रुंजी घालती मनात
तुझे गंधाराचे सूर
झाले कधी, कसे क्षीण
गेले कानांच्याही दूर





रुंजी घालती मनात
माझे तुझ्यात गुंतणे
स्वतःला हरवणे
मी ग माझा न उरणे

रुंजी घालती मनात
हळव्या क्षणांच्या त्या स्मृती
श्वास तालांचे अद्वैत
भाव विभोर दिन राती

रुंजी घालते मनात
असे सारे विश्व तुझे
व्यापूनी अंतर्धान होते
माझे जीवन शून्य होते ...

माझे जीवन शून्य होते...

**१६.१०.२०२१ वाई**

# रिक्त

पाहतो तुला मी जेव्हा
तेव्हा भारावून जातो
मन बाग बहरूनी येतो
जो तुझ्यावरी अनुरक्त!

मन बोलू लागते खूप
पण शब्द न देती साथ
एक तूच डोळ्यासमोर
ना विचार तुझ्या व्यतिरिक्त!

बोलती डोळे ही भाषा
आणि शब्द थोकडे पडती
सारे समजूनी घेती
जरी काहीच नाही उक्त!

मन पक्षी आकाशी उडती
भावविभोर शब्द गोठती
डोळ्यातून संवाद होती
हास्य पडे इथे उपयुक्त!

भरभरून प्रेम हृदयी
प्रेमाचीच शिंपण होई
बोलणे, चालणे, भेट!
साऱ्यात प्रेम ते व्यक्त!

हळूहळू अंतर मिटते
अंतराशी अंतर जुळते
अद्वैत आपुले घडते
एकमेकांत होतो रिक्त!

**२६/०७/२०२१ वाई**

# चिंब सरीत भिजताना...

चिंब सरीत भिजताना
लपतात अलगद
ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा
आणि हलक्या होतात
अडथळयांच्या जड बेड्या

चिंब सरीत भिजताना
निघून जातात अलगद
कपाळावरच्या सदा सोबती आठ्या
गात्रे आठवतात उबदार आश्वासक मिठ्या

चिंब सरीत भिजताना
विसरते शरीर-मन अलगद
किती किती बंधने
सुट्या होतात ताणाच्या साखळ्या
विहरते आनंदाने

चिंब सरीत भिजतानाच
का बरे असे होते?
पडतो मनाला प्रश्न -
एरवी का मन शरीर
राहते रुक्ष रिते?

चिंब सरीत भिजताना
तीच सांगते अलगद
ठेव तन मनात स्नेह
प्रेमाचा ओलावा
चिंब सरीत भिजण्याचा
रोजच येईल सांगावा...
रोजच येईल सांगावा!

**०८/०८/२०२१, वाई**

# हात

दिवसभराच्या धबडग्यानंतर,
कपाळ थोपटून शांतविणारे,
लटक्या वरवरच्या रागातून
हलकेच गालावरती चापट देणारे,
हातात घेताच सुरकुत्या असूनही
कापसाप्रमाणे मऊ भासणारे,
लहानपणी बोट देऊन
उठायला, चालायला शिकवणारे,
बोटे पकडून पाटीवर अ आ ई
लिहायला शिकवणारे,
सिग्नल प्रमाणे जीवनाच्या वाटेवर
"थांब, हळू जा, निर्धास्त पुढे जा" सुचविणारे,
वेळोवेळी वाहणाऱ्या आमच्या
भावनांच्या गंगा, जमुना
बांध बांधून थोपविणारे,
आमच्या मुंगीएवढ्या यशाला
पाठीवर शाबासकीची थाप देऊन
हत्तीचे बळ देणारे,
कितीही मोठे झालो तरी
प्रेमाने कुशीत घेणारे,
पाया पडो न पडो
सतत भरभरून आशिर्वाद देणारे,

लेकरांना भरभरून देणारे,
आणि बदल्यात काही न घेता
कायम रीते राहणारे,
विलक्षण माया देणारे,
आणि माया मोहातून
मनास जागेवर आणणारे,
प्रसंगी लोण्याहूनही मऊ,
प्रसंगी वज्राहून कठोर होणारे,
आंजारणारे, गोंजारणारे,
जोजवणारे....
आई ...तुझे हात...
आज तेच आठवले
नकळत त्यांच्या आठवणीत
माझे हात जुळले

**०८/०७/२०२१, वाई**

# जीर्ण पाचोळा

होते धूसर, जगण्याची ऊर्मी
आणि धूळ चढते, हरित वस्त्रांस
खोल होती, पूर्वीचे उथळ श्वास
जीर्ण पाचोळा पडे तो उदास

होती हिरवी, दुनिया कधी तयाची
भोवती गंध, फुलांचे सुवास
आता उरला, केवळ इतिहास
जीर्ण पाचोळा पडे तो उदास

नाही केली, अपेक्षा फळांची
जणू जगली, शिकवण ती गीतेची
उदयाच्या, मागेच धावे ऱ्हास
जीर्ण पाचोळा पडे तो उदास

दावी उलगडून, सृष्टीचा नियम
अंत उदयाचे, सांगतसे मर्म
जाणीवेची, करुन आरास
जीर्ण पाचोळा पडे तो उदास......

**०४.०३.२०२१, वाई**

# लहर

मिसळले रंग
अनोखे कोलाज
हरवली लाज
कोणीकडे आज
सावळरंगांची मिसळण
देहभान सळसळ
मन पिसे, हलके पिसासारखे
क्षणांची चळवळ
नुरले शब्द
उरले श्वास
आसांचे अब्द
भावनांचे रो रो वादळ
घनघोर पाऊस
घामांचा सुवास
शहाऱ्यांचा बहर
अंगांगावर
अचानक येते त्सुनामीसारखी
कशी ही लहर
बाकी सगळ्यांची धूळधाण
किती केला कहर
पुन्हा सर्व शांत
तृप्ती मात्र अस्वस्थ

माझी मागणी राहीलीच पुन्हा
त्यासाठीच का पुन्हा येणार
आणखी एक लहर?

**पावसाळा, २००२**

## नवे नाते

स्पर्शून ओळखून अंगांग - मन
तू आता अनोळखी
खरंय आता लख्ख उजेड
त्या रात्री काळोखी

ती ओढ, ती हूरहूर
आसुसलेले मन, शरीर
आता उडाले पक्षी दूर
गात्रे गाती एक, मनी दुसरेच सूर

आताही रोज भेटतो आपण
दोघांच्या मनात रोज कुणकुण
मी दाखवतोय विसरल्यासारखे पण
तुझ्या मनात असतील का ते क्षणक्षण

डोळेच बोलतात एकमेकांशी
आणि उघड्यानेच मिटतात
खोल तळाशी मनांच्या स्मृतिचित्रे
पाहून त्यांचे पारणे फिटतात

बोलत काहीच नाही आपण
शक्यच नाही आता ते
बोलतो वरचेवर आणि निरर्थक
दोघांना आतल्याआत कळते

ती बहर, ती लहर
ते शरीर, ते मन
आता केवळ स्मृतींचा कहर
परतणे असंभव, मन उन्मन

ओळखून आता हे
नविन वळणावर जाऊ या
नव्यानेच भेटून, नविन नाते
जुळते का, पाहू या!

नसतील त्या भावना उद्रेक ;
पण असेल मन तुझे - माझे ;
जुन्या नात्यांना लावून ब्रेक
गाठू क्षितिज ; टाकून येऊ जुने ओझे

**११.१२.२०१४, वाई**

## **श्रावण** ( हायकू )

रंगबावऱ्या
श्रावणसरी येती
धरेवरती

चिंब भिजूनी
आज अवनी लाजे
अंकुर रुजे

मन फुलले
गंध भारले झाले
सुखात न्हाले

हिरवी गर्दी
व्यापून गेली सृष्टी
मेघांची वृष्टी

वर्षभर का
नाही एकच ऋतू?
सांग सखे तू!

भारावलेले
लुब्ध ' श्रावण मन '!
आनंदी घन!!

**०५.१२.२०१८ वाई**

# आई

आई तुझी आठवण येते
अधून मधून कधीतरी
अगदी ताणात, एकटेपणात
पत्र नाही, फोन नाही - तुझी सदा तक्रार जरी

तुझे बोट धरून चालू लागलो
तुझ्या बोटांना धरून लिहिले 'आई'
तुझ्याच हातांनी भरवलेस पहिले घास
तुझ्याच हातांनी थोपटून झोपलो आई

जेव्हा ठेच - तेव्हा आई
भिती, निराशा - तेव्हा आई
उध्वस्त, शून्य - तेव्हा आई
काहीच नाही - तिथे आई

ठेचकाळल्यावर, अडखळल्यावर
मदत हिची, आठवण तुझी
हरल्यावर, हिरमुसल्यावर
जगवतात आशा, प्रेमाची ओझी

उत्तररात्री, अचानक,
झोपमोड झाल्यावर
कालच्या अर्धवट कामाचे,
उद्याच्या ताणाचे ओझे डोक्यावर

वाटते तुझा हात फिरावा केसांमधून
जीवनात आजवर सर्व परीक्षा
 जिंकल्या याच बळावर

म्हणावे " बाळा दमलास का रे?
हाही काळ जाईल .....
मीट डोळे, झोप आता,
सारे काही ठीक होईल "

मुलीप्रमाणे जाहीरपणे आई - प्रेम
दाखवू नाही शकला मुलगा जरी
दगडाच्या हृदयात, प्रेमाचा पाझर
झिरपत असतोच कुठेतरी

तू ते समजून घेतेस
म्हणूनच तू आई असतेस खरी
नातवांना लावून जीव
स्वतःच पुन्हा भरून काढतेस दरी

जपतो असंख्य नाती, ऋणानुबंध आपण
पण या नात्याला नाही पर्याय
निरपेक्ष प्रेमाचा, अखंड झरा
ज्याची त्याची माय!!

**७/४/२०१५, वाई**

## हो जागा

का सुकतोस, वाळतोस?
दोन्ही कडांनी ओसंडणारे
आहेच ना पाणी!
मग त्यातच भिजून हो ना
पुन्हा ताजातवाना!
उत्साहानं जगण्याचे बळ
पुन्हा एकवटून....!
पुन्हा धडपडण्यासाठी!

द्वेषाचे आगझोत
चहूबाजूंनी येतायत...
उन्मेषाचे तुषार शिंपडून बघ
त्यांवर!
थोडी काहिली
पण होईल शांत!
अजून नाही आली वेळ!
दूर आहे अंत!
सोडून खंत-प्रांत हो जागा!
पुन्हा जगण्यासाठी,
भरभरून जगण्यासाठी!

**1999, मुम्बई**

# उर्मी

तुझ्या भेटीची उर्मी
आता कधीतरी होणारा
उल्कापात....
विचार तुझेच, आचार भलतेच
आता शुष्क, कोरडे
दिवसरात.....

तुझ्यासाठीच श्वास,
तुझे घर माझ्या काळजात...
आता हे फक्त भास की इतिहास?
उन्मन, घालमेल... अंतरात...

सुटली कशी मिठी, तुला दिठी
प्रश्न खोल उरात....
पंख लावून उंच आकाशी मन,
डंख लागून मृत, ऐन भरात..!

असे कसे अवेळी मरण?
प्रेमामध्ये घातपात?
जळत्या राखेतून फिनिक्स होण्याचे
पुन्हा बांधतो स्वप्नघाट!

पुन्हा सार्थ नजर भेदून
सांद्र तुझ्या नयनात...
पोचवतो भावफुले अंतरीची
मूकशब्दांच्या उद्यानात...

**०५.०१.२०१८, वाई**

# कोण

आयुष्याच्या या वळणावर
साथ मला रे देते कोण?
घ्यावी दखल, द्यावे लक्ष पण
हात मला रे देते कोण?

वागून आजवरी सौहार्दे
परतफेड ही करते कोण?
विसरून हात मदतीचे हे,
दात पुन्हा दाखवते कोण?

अशी कशी ही होते स्थिती
कृतघ्न भाव दाखवते कोण?
गरज सरो अन् मरो वैद्य हा
भाव खरा भासवते कोण?

सोडून द्यावे, माफ करावे
या सर्वांना,ही वाक्ये दोन
वदवूनी येशूपरी सुळावर
सदाकदा चढवते कोण?

नव्हतो मानत कधी अस्तित्व-
तुझे, आता भासवते कोण?
"सोडूनी द्यावे दुःख तुझ्यावर!"
म्हणूनी मला हासवते कोण!

**०८.०१.२०१७,वाई**

## आताशा

आताशा न येतो
हात तुझा ग
हातात माझ्या;
मग ' एकला' राग!

आताशा न टेकते
डोके तुझे ग
खांद्यावर माझ्या;
मला सदाची जाग!

आताशा न पडते
खळी तुझ्या गालावर,
फिदा कधी, आता फिदाईन,
पाहताच ती! नाचेन तालावर!

आताशा न येते
रेषा स्मीतेची ओठावर,
कधी आकंठ बुडालेला मी,
आता झुरतो बसून काठावर!

आताशा न फिरतात
माझे हात,
केसांतून तुझ्या;
उदास रात!

आताशा न घडते
उराउरी भेट,
तुझी नी माझी;
शुष्कच पहाट!

आताशा न मीलन,
रुसली रात्र;
तरी आस स्वप्नांना,
पाहती ही गात्र!!

**१५.०१.२०१८, वाई**

## तेंव्हा आणि आता

विशीतला प्रेमाळलेला
'क्रिएटिव्ह, पॅशनेट गाय'
बाहेर असतो गोगलगाय
आणि घरात कठोर, श्रुड!
तेंव्हा खिशात नसता काही
मित्रांसाठी उसना खर्च
आता जरी स्वतःसाठी गरजेचे
पण हात होतो आखूड!

तेंव्हा लाजवणारी सायकल
स्वप्नात येणारी बाईक, कार
आता दोन्ही ठेवून गॅरेजात
पुन्हा वाटते सायकल गोड

तेंव्हा कायम खादाडभाऊ
मिटली नाही सवय
आता restricted डाएट
अन् रुसली बिचारी भूक!

देह होता चपळवीज
म्हणे स्वतःला रॉबिनहूड!
उलटताना चाळिशी मात्र,
आता उरले एक धूड...

विशीत होता जोर, जिम
प्रोटीन नि खारिक पूड
आता वेळ मिळाला तर लंच
नाहीतर आहेच जंक फूड!

नव्हते जरी सहा पदर
तरी सपाट होते उदर
'पॉट बेली' आता गरगरीत
सांभाळताना मिटते खोड

क्वचित मिळे चॉकलेट तेंव्हा
माहित फक्त लिमलेटची गोळी
आता कोलेस्टेरॉल, बीपी, शुगरची
गोळ्या खाण्याची जिरलीय खोड

आधी बोट धरून चाललो
मग भावना दुखावून वागलो
त्या जोडीची थकलीयत गात्रं,
आता त्यांच्या प्रेमाची पुन्हा ओढ.

स्नेह्याना होती करमणूक महत्वाची
आणि त्या दोघांना आम्ही
जाणवलीच नाही ही आस्था
मन म्हणते आता अहंकार सोड

अशी कशी होते उपरती
उशीरा जाग, अपूर्ण कृती
मना विसरून दिखावा, आभास
मनाचे मनाशी नाते जोड

**2015, वाई**



## गीत एकट्याचे

जे साहतो एकट्याने
न सांगू शके मन माझे
विवशताच भरून उरली
साहू कसे हे ओझे? ।। ध्रु ।।

डोळ्यांतूनी झरणारे
हातात झेलतो मी
अश्रु तुझे ग माझ्या
प्राणात पेलतो मी
प्राशून ग तयांना, होती घाव हे ताजे ।। १ ।।

हुकले जरी ग काही
मृद्गंधी आसमंत
तू सर्वस्वी वेगळीच
मनमनानी श्रीमंत
ठरलोच करंटा मी आणि तू मनाची राजे ।। २ ।।

समजले ना, ना समजेल
तुझे हृदय इथे कोणी
दगडांचीच वस्ती इथे
कशी पाहतील हृदय लेणी?
हृदय थोर विशाल पाहिजे, जेथे ते ग विराजे ।। ३ ।।

वाटा दोघांच्या का
वेगळयाला, कळले नाही!
वेळ देऊनही, खासा,
का सुर जुळले नाहीं
झालो न योग्य तुझ्या, नाते कसे हे साजे? ll ४ ll

**१२.०४.२०१८ वाई**

# मी गेल्यावर

राहील सारे इथेच
अन जाईन मी कोठे
श्वास घेईन अखेरचा
अन बंध होतील सुटे

देह अचेतन जशाचा तसा
परि चैतन्य कुठे?
सत्य एकच प्रेत
बाकी सर्व, सर्व झूठे!

काय काय मिळवले?
अन काय ठेवले? कोठे?
छुपी उत्सुकता असेल का?
कळेना मन कोणाचे कोठे!

सरणावर जळलो मी लवकर
आता वेळ कोणाकडे कुठे?
मी गेलो तरी पृथ्वी फिरते,
सारे चक्र नियमित इथे!

कशासाठी मी आलो इथे?
नेले काय 'तिथे'?
सोडले काय काय इथे?
कशास्तव फिरत राहिलो इथे?

फिरत राहीलो ज्यासाठी वणवण
सोबतच ते होते
आयुष्यभर सुख मिळवले कुठे?
अजाण मन रिते!

माझ्यासारखे नका करू तुम्ही
रंगीत कागद थिटे!
आनंद घेता सभोवतालचा,
डोळयांचे पारणे फिटे!

क्षणाक्षणाला मोहरून जा
हौस मनाची फिटे!
गाणे गात जा आनंदाचे,
जागे व्हा या इथे!

समजून उमजून कानाडोळा
आसक्तीमागे फिरतच राही!
झाली संध्या, हुडकून दमलो
उरले हाती काही नाही!

ज्याचे त्याचे विश्व स्वतःचे
कोण रिकामा कुठे?
अरे, इकडे लक्ष द्या की रे,
आवाज पोचतो कुठे?

ज्याच्या त्याच्या ठेचा
ज्याने त्याने खाव्या
चुकून आली जाण
सूचना देती मानव्या

वाचून आता तुम्ही तरी
व्हा खडबडून जागे,
जगा क्षण क्षण आनंदाने
समाधानाचे उडू दे सदा कारंजे!

**४/७/२०१५, वाई**

# अंतर

डोळ्यांपासून जरी गेलीस दूर
हृदयापासून जाऊ नको
आठवणींचा आपुल्या खजिना
ठेव, लुटून नेऊ नको!

शिशिराची पानगळ जशी
तसे प्रितीचे होते
येईल वसंत पुन्हा
ह्याची खात्री, नाही खोटे!

दोन ध्रुवांवर, अधूनमधून
ठरवून जायचे असते
विरहाशिवाय एकमेकांचे
महत्त्व कळायचे नसते

किती दूर, कधी जवळ
अस्तित्व आपले नाही-
एकमेकांविना पूर्ण कधीच...
कहाणी अधूरी राही!

मग साहू हीच अवस्था
अन् असेच नेहमी राहू
एकमेकात ठेवून अंतर,
जवळ सदाचे राहू!!

**१२.०४.२०१८. वाई**

# तू

मी हुडकतो तुझ्यामध्ये
एक धुंद स्वप्नपरी
तू सदा गर्क मुलांमध्ये
डबा,अभ्यास सदा घरी

मी म्हणतो तुझ्याबरोबर
झाडांभोवती फिरून म्हणेन गाणे
तू...... सारखी मुलांबरोबर
संस्कार गीते अन् बडबडगाणे!

होता अद्वैत, बेधुंद
चरक्षणाला दारी टकटक
कोणी रुग्ण, तुझा याचक
कसले आयुष्य, कसली कटकट

क्षणात जागृत कर्तव्यापरी
होतेस, विसरतेस सुख
किती भूमिका दिवस रात्रभर,
अचूक निभावतेस, विसरून तहानभूक

हट्टी, बालिश हे माझे मन
हृदय तुझे ग, विशाल, निर्मळ
समजून घेशी, समजाविशी ही
अशी कशी तू प्रांजळ, प्रेमळ

तू क्षणिक काळाची पत्नी अन्
अनंत काळची माता
खरीच म्हण, अजब रसायन
स्त्री म्हणजे कधी न ये सांगता!

म्हणुनच शून्य अस्तित्व माझे
तुझ्याविना हे या पृथ्वीवर...
जा घेऊन रे मलाच आधी...
नको पोरका करू, परमेश्वर!!

**१२.०४.२०१८ वाई**

# सांज

डोंगरराजीतील वृक्षांवरती
विसावलेली सांज सुगंधी
सुरेल वायू, सुगंधी स्वर
भेट निशा- दिनाची अनुबंधी!

शांत नितळ पाण्यातून
थरथरून दिवे तरंगती
सांद्र आर्द्र हवेतून
रंगधुंद गंध वाहती

का भावुक न होईल
मन हे कातरवेळी
प्रकाशता तारकांनी नभ
भारावली रात्र काळी

शोध नाही घेत आता
सुंदर, देखण्या स्थळाचा
जेव्हापासून तू माझी
स्वामी मी साऱ्या जगाचा!!

**२७.०४.२०१८ वाई**

# विसरलास तू

विसरलास तू, भेट आपली
सांग कसा तू, विसरलास रे ll ध्रु ll

सागरतिरी, वाट आतली
भेटताच तू मिठी घातली
उष्ण श्वास अन् हृदयी धडधड
मागे मग सरलास का रे? ll १ ll

निशिगंधाच्या झाडाखाली
श्रावणातल्या ओल्या रात्री
सुगंध भारित चिंबचुंबने
तरीही रिता उरलास का रे? ll २ ll

संकेताच्या प्रेमधुंद स्थळी
ठरलेल्या, भारलेल्या वेळी
अद्वैताचे प्रमाद आपुले
हरले मी,तूही हरलास का रे? ll ३ll

**26.06.2018 वाई**

## आठवणींची जखम

नाही पडू दिले दिले कधी पदरी
तू सुखमय जीवनदान
अन नाही दिलेस करू जरी
ठरवले करू विषपान! || धृ ||

तव दुःखाचे झरे वाहती
मम ह्रिदयातून दिनरात
विचार करुनी श्वास कोंडतो
जगणारे कसे जगतात?
वियोग येण्यापरीस जर
मृत्यू आला असता...
वाहून आठवणींची जखम
दुःखाचा पूर आला नसता

तू जे दिले मजला
हरवले कवितेचे पान ll १ ll

तुझ्या आकांक्षा, तुझी मनोरथे
जड, उंच क्षितिजापार
दौड तुझी, माझी मग परवड
कशी जुळावी तार?

प्रिती जरी खूप,वेग जुळेना
झाली खूप दमझाक
सारे सुंदर, तरी स्वप्नांना
कशी लागली आग?

एका रथाची विजोड चाके
उशिरा आली जाण ll २ ll

**२७.०६.२०२८ वाई**

# फूल

फूल रंगुनी हसते जेंव्हा
 कळीतून बहरताना
हसते तेंव्हा मनही
 आपुले हे पाहताना!

फुले हासती कशी गालातून
कळीमधूनी जन्मताना
सुगंध सांडती कशी सभोवती
अचल, अबोलही असताना

आनंदाचे तरंग कसे पसरवती
स्वतः वाहत नसताना
निर्भेळ सुख सर्वत्र वाटती
अटी शर्ती नसताना!

अर्थ वेगवेगळा घेती नकळत
जेथे पडती त्याचे होताना
हात, केस, प्रेत वा देव असो मग
भाव समर्पणाचा घेताना

आनंदाने जगती कशी
आयुष्य चार दिस असताना
आतातरी शिक त्यांच्याकडून
अर्धेपुरे उरले असताना!

**३०.०६.२०१८ वाई**

# छाटलेले पंख

माझेच मम हातांनी मी पंख छाटलेले
घरटे कधी न सोडण्याचे, मनी विचार दाटलेले

कित्येक भव्य क्षितिजे,करत होती इंतजार
माझ्याच तन-मनाने ते मोह टाळलेले

रुचला न भाव माझा कोण्याही सुहृदाला
माझ्याच अंतर्मनाचे मी आवाज ऐकलेले

असते कधी असे का? कधी त्यागतात पंख?
प्रश्नरुपी डंख मात्र वर्षानुवर्षे साहिलेले

कधी संभ्रमात पडतो, अन् गोंधळून जातो
शंका - राक्षसाने मन- आभाळ फाडलेले

आता इलाज नाही, जाणे पुढे तसेच
माझेच मी स्वतःत मग बळ आणलेले!

जे जे होते ते चांगल्यासाठी
घर, प्रेम कुटुंबाचे दिनरात लाभलेले!

**२७.०३.२०१६ वाई**

## गरुड

निळया नभातून
उंच ढगातून
विहरूनी आलो
आज मी पुन्हा गरुड झालो

सों सों वारा
वाट मोकळी
तुडवूनी आलो
आज मी पुन्हा गरुड झालो

रंग वेगळा आकाशाचा
गंध निराळा या दुनियेचा
हरखूनी गेलो
आज मी पुन्हा गरुड झालो

खुजी माणसे आणखी खुजी
दृश्य विहंगम, दुनिया दुजी
समजूनी गेलो
आज मी पुन्हा गरुड झालो

बंधन गेले, स्पंदन आले
कूपमंडूक मन विशाल झाले
सावरलो, स्फुरलो
आज मी पुन्हा गरुड झालो

नैराश्यधारा एरवी सहा
चिंब तनमने, जीवन दुःखदा
ते झटकुनि गेलो
आज मी पुन्हा गरुड झालो

नाही गाठणार निराश धरणी
सकारात्मक मन त्याची करणी
स्फुल्लंगून चेतलो
आज मी पुन्हा गरुड झालो

घेऊन सोबत, दोस्त सोबती
गाठीन क्षितिजे नवनवी ती
ठरवून सरसावलो
आज मी पुन्हा गरुड झालो

**३०.०४.२०१६ वाई**

# थंडी गुलाबी

थंडी गुलाबी
सर्द भिजल्या गात्री
धुंदी शराबी

थंडी गुलाबी
शहारल्या अंगांगी
स्पर्श शराबी

थंडी गुलाबी
रोमांच अंगभर...
तो प्रेमज्वर!

थंडी गुलाबी
रोम रोम अस्वस्थ...
जबरदस्त!

थंडी गुलाबी
होऊ मुक्त मोकळे
" खा, ईव्ह, फळे "!

थंडी गुलाबी
घडून आपसूक -
गेली की चूक!

थंडी गुलाबी
तिची भोगतो फळे!
त्या चुकीमुळे!!

**०३.१२.२०१८ वाई**

# वेचलेले क्षण

वेचलेले मोहक क्षण हे
पुन्हा विखरू नये ग
ही रात्र जागून जगू या
या रात्रीतच मरू सये ग!!

आता सकाळ ना कधी व्हावी
आशा ही निशा पालवी
दोघांतले हे अंतर
नाहीसे करू सये ग!

दुनियेची नजर तिरकी
छळते ती सतत मनाला
अंधार मित्र बनला,
धुंद, मुक्त फिरू सये ग!

समोर अंधारले जग हे!
मागेही मिट्ट काळोख!
पटली अंतर्बाह्य ओळख
अन्योन्यात वीरु सये ग!

**१०/०१/२०१७ वाई**

# आरोपी

नेहमीच उभा मी
पिंजऱ्यात आरोपीच्या ...
आणि सतत उलट प्रश्न -
विचारतात सारेच....
सारे माझेच प्रमाद
त्यांच्या दृष्टिकोनातून....
मी केलेले, झालेले...
काही अनभिज्ञ, काही ज्ञात
कुठलीच कृती सर्वमान्य नाही!
काही - ना- काही तक्रार आहेच!
मग....
ह्या पिंजऱ्यातच राहतो घर बांधून
कायमचा -----
पुन्हा पुन्हा आघात करतो सहन!
अर्धमेला सदाचा ....
मरणापूर्वी कायमचा .....

**१५.१२.२०१७ वाई**

# हरवली वाट

जीवनाची हरवली वाट आहे
सरळ नाही, सदाच घाट आहे

कमळ होईन म्हणून चिखलात गेलो
माझी मीच धरली मळवाट आहे

झाले भलतेच मी निवडुंग झालो
साज काट्यांचाच हा अंगात आहे

बेरीज करण्यास धडपडला जीव माझा
वजाबाकीच प्रत्यक्षात आहे

मित्र शोधून दमलो गर्दीत साऱ्या
स्वार्थलोलुप सगळा भाट आहे

माझी आवड अन् निवड भिन्न होती
उमगले ना मजा कशात आहे

रोज सरण भावनांचे जाळून येतो
रोज मरणे जगून, क्रमप्राप्त आहे

वाटे जग दुष्ट, मीच सभ्य एक
जग विचार मात्र विपरीत आहे!

कसा चुकलो सांगे ना कोणी
दुःख सर्वत्र का काठोकाठ आहे?

काटे अंगांगभर, फूल आलेच नाही
जरी हिरवा, परी ' निवडुंग ' मी; एकटाच आहे!

सोडली का दिठी, सुटली कशी मिठी ग
शोधूनही ना सुखाशी गाठ आहे

भोवती हसणारे, खिजवणारे खूप
कोणी थोपटेना दुःखात पाठ आहे

म्हणे कोणी बदलून बघ चष्मा
स्पष्ट सारे, गवसला काठ आहे

काटे गेले, बहरले फूल, अंगांग खुलले!
जरी निवडुंग, कमळाचा थाट आहे!!

**१३.११.२०१५ वाई**

# गाव

दूर डोंगरात माझा गाव आहे
साधे सोपे तयाचे नाव आहे

झाडे, फुले,हिरवी मुक्त उधळण
निसर्गात रमला गाव आहे

पाऊस आणि देव जगवतात
शहरी सुबत्तेचा इथे अभाव आहे

आमदानी थोडी, खर्च जेमतेम
सारेच रंक, ना कोणी राव आहे

जाती- पातीत गल्ल्या वेगळाल्या
माऊली, भैरोबा साऱ्यांचा देव आहे

माती तशीच, शेती तशीच आहे
विज्ञानाचा ना पसरला ठाव आहे

भूत- खेते-जित्राब- मुंज्या धरती सर्वा
त्याकडे नाही भेदभाव आहे!

नाती घट्ट आणि जाती घट्ट
प्रेम मर्यादित हा स्वभाव आहे

शिक्षणाहून सणा ज्यादा महत्त्व
" शिकून जाईल निघून" भयभाव आहे!

शेजारी हा सदाच झोप शत्रू
अबोला आणि वैर भाव आहे

ईर्षा आणि महत्त्वाकांक्षा नाहीच कसलीही
रेटणे आयुष्य स्थायीभाव आहे

वीज पाण्यासाठी नाही, मंदिरांसाठी--
एक होणे देवाचा प्रभाव आहे!

दिवसरात्र अशी ही झोप मरगळ
गावात ना कसला उठाव आहे!

कशा सुटतील कुरीती, अंधश्रद्धा
डोळे असून आंधळा जमाव आहे!

कधी पोचेल ठिणगी, पेटेल वणवा
धग कधीचीच विझली राव आहे ...

यावा लागेल त्यासाठी कोणीतरी क्रांतिकारी
म्हणतील त्यालाही नाव "देव" आहे!!

**३०.११.२०१५ वाई**

## महाबळेश्वर

उतरत्या डोंगररांगा
अर्धवर्तुळी शेती
पायऱ्यांचा आभास
त्यात पिकती मोती

इथे तिथे सर्वदूर
घनदाट गर्द झाडी
बहुत पक्षी, हरीण, गवे
श्वापदेही काही थोडी

लाल वाटा रानोमाळ
दाट किर्र सळसळ
आणि घोड्यांच्या टापा
निळ्या नभी, लाल धूळ

हिरव्या, छोट्या पानांवर
पांढरी ही फुले
लाल रंगी मातीसंगे
लाल स्ट्रॉबेरी खेळे

पांढरी फुले, लाल फळं
हृदयाचा जणू आभास
थंडीची दुलई, अभ्र आभाळ
उत्साहाने भरले निःश्वास

मलबेरीच्या अंगावर मळ
गुजबेरीची गोड गूज
स्ट्रॉबेरीची गाली लालिमा
नववधू क्षणी विसरली बूज

मधुचंद्राचा गाव म्हणून
तुझे जगभर नाव
रानमेवा आणि मधाचा
ठायी ठायी ठाव

लागता मधुचंद्राचे वेध
समोर प्रथम नाव तुझे
आनंदाची वने उपवने
मन हर्ष-उल्हासात भिजे

जे शब्दांच्या पलीकडले
ते सारे ठावूक तुला
लेवूनी हिरवा साज अंगांगी
झुलविसी आनंदाचा झुला

शुभ्र धुक्याची रजई
मन मोकळा एकांत
शहारे, लाज आणि धुंदी
तन-मन निवांत निवांत

नवजीवनाची नाव डोलते
वेण्णा तळे देते साक्ष
हातातून ना हात वेगळे
"सारे अद्वैत" पाहती चार अक्ष

आणाभाका, घट्ट मिठ्या
चिंबचुंबन, मिट्ट दिशा
तारुण्याचेच पांघरूण अन् उशा
भान हरवते दिन की निशा!

पाच नद्या आणि देव
खरे पावित्र्याचे सार
साक्षी लक्ष सहजीवन आरंभांचा
महाबळेश्वरा नमस्कार!!

**२००२. महाबळेश्वर.**

# पाचगणी

पाच पठारांनी सजलेले
गाव माझे बहरलेले || ध्रु ||

रानफुलांची इथे दुलई
रंगीबेरंगी विण घेई
इथे येताच शीण जाई
आनंदाला उधाण येई

अनवट वाटांनी कोरलेले || १ ||

इथली विशाल पठारे
नाव जगात त्यांचे पसरे
सडे आणि थापे सारे
हिरवाईने नटती पुरे

धुंद धुके पसरलेले || २ ||

उंच माथे आणि कडे
नागमोडी वाट त्यांसी जोडे
पाहुणघरांचे देखणे खडे
शाळांचेही इमले बडे

प्रेम-अभ्यासी हरवलेले || ३ ||

नव्या नात्यांच्या सुरुवाती
मधुचंद्रांच्या कैक राती
थंडी गुलाबी पांघरून घेती
देहभान विसरून जाती

प्रेमस्पर्शाने शहारलेले || ४ ||

इथली हवाच एक सुवास!
सौंदर्याचाच फक्त वास!
स्वच्छ, निर्मळता आसपास!
दरी डोंगरांचा सहवास!

उंच झाडांनी घेरलेले || ५ ||

ग-म-भ-न ची सुरुवात
शिक्षणाच्या माहेरघरात
सरस्वतीचा आशीर्वाद
घडवली मोठी कारकिर्द

अक्षरांनी जगी कोरलेले || ६ ||

इथे जीभाही हासती!
चणे-फुटाणे फोडून खाती!
स्ट्रॉबेरी-मलबेरीच्या शेती,
जाम-जेलीचे उद्योग किती!

रसनांमध्ये भिजलेले || ७ ||

शुभ्र धुक्याच्या धुंद वाटा!
घोड्यांच्या खड्या टापा!
मारा कितीही इथे खेपा!
ठेवा आनंदाचा जपा!

हर्ष उल्हासात भिजलेले || ८ ||

किती मुसाफिर रोज येती,
विसावून निभ्रांत होती!
हर्ष-ऊर्जेची भरभरून पोती,
गाठी बांधून घरा परत जाती!!

आठवणींनी डवरलेले || ९ ||

**०१.०९.२०२० पाचगणी**

# उध्वस्त

उध्वस्त इमारत आणि
चौफेर विखुरलेल्या आशा
भंगलेले कोपरे -कोनाडे
' अस्तंगत ' पूर्व दिशा

हा कसला धरणीकंप
विन्मुखले सारे प्यारे
भोवऱ्यात मनाची नाव
अदृश्य किनारे सारे

ही वाट झाली अदृश्य
हरवली भूतकाळात
भावना - गोठल्या - थिजल्या
मन डोहाच्या जळात

असे झाले काय अचानक
मन झाले का उन्मन
अपेक्षांची कोळीष्टकं
कृमी किटकांचाच सन्मान

हरवून आत्मविश्वासाचे सूर
गाणे भासे बेसूर
अश्रूत नाहले ऊर
मन पक्षी उडाले दूर

का पडलो या गुंत्यात
डोळा पट्टी बांधून उडी
मोडलेल्या मन अंगाने
दुःख सागरी मारतो बुडी!

**१७.१२.२०१५ वाई**





## फुलाचे मनोगत

तुझ्या केसात खुलण्यासाठी
मी आज फुललो ग!
आनंद तरंगांचा झुला
मनमुराद झुललो ग!

क्षणभंगुर आयुष्याचे
दुःख मी विसरलो ग...
लांबसडक केसांत तुझ्या
मुक्त मी पसरलो ग!

काढून वाट काट्यांमधूनी
मी कसा उमललो ग
अर्थ रंग अंगांगाला
तुझ्यासाठीच, उमललो ग!

ल्यालो तुषार आनंदाचे
चिंब चिंब भिजलो ग!
साठवण्या ते उरात
मी क्षणैक थिजलो ग!

संपणार उद्या हे सर्व
अर्थ तो उमजलो ग!
का हरवू आनंद आजचा?
जाणलो, समजलो ग!

आयुष्य केले निछावर, तुजवर,
मी माझा न उरलो ग!
समर्पण हेच जीवन फुलांचे
आता निश्चेष्ट उरलो ग!

नव्यानेच फुलण्यासाठी
आता निश्चेष्ट उरलो ग!

**२६.१२.२०१५ वाई**

# श्रावणात घन उष्ण निळा

श्रावणात घन उष्ण निळा
झाला कोरडा पाषाण....
रिमझिम धारा डोळ्यांमधूनी
शेतं बनली स्मशान ....

अंत्यविधी रोज पीक - कोंबांचे
स्वप्ने धरतीची बेचिराख...
आता कसे फुटतील धुमारे
आसवांचा पाऊस, आसांची राख ....

जागून ज्याची वाट पाहिली
ते सुख दारी उगवलेच नाही
जिथे तिथे भेटती भेगा
धरणीत बी यंदा रुजलेच नाही

नक्षत्रांमागून गेली नक्षत्रे
' पावश्या ' ची करून झाली आराधना
धोंडी धोंडी पाणी दे म्हणूनही
आकाशाला पाझर फुटेना

रंगांचे रान दिसले नाही
तरी हरवले स्वप्नांचे पक्षी
तृषार्त मनाने मयूर बोलती
नाही थेंब ढाळलास, जीव तरी रक्षी

जन्मलेल्या वासरासाठी गाईला
कसा सुटेल रे पान्हा?
हिरवाई अंतरली यंदा
गेला कुठे रे कान्हा!

सर धावून आली नाही
मडके मात्र गेले वाहून...
आसवात भिजले अंग
नदीचे कोरडे पात्र पाहून...

कर्जाचे डोंगर करपले काळे
व्याज, तगाद्याचे पाणी
गळफासाचे पीक जोमात
संपल्या घरच्या नोटा, नाणी

दूर क्षितिजावरचा काळसर ढग
अजूनही लावतोय आस...
बरस थोडा तरी आता रे,
नको मृगजळाचे भास .....!

**०४.०९.२०१५ वाई**
**पूर्वप्रसिद्धी - दैनिक सकाळ २८/११/२०१५**

# सावध

विश्व तांडव
इतुक्या जंतूचे
मेदिनी थरथरते....
डोळे करून मोठे,
भरून,
आई "सावध" म्हणते .....

"सांभाळ, नाही सोपे"
रांगेतून येऊन,
थांबून,
जळणारी चिता,
धगधगत सांगते .....

उराउरीच्या भेटी,
आणि सहज उगाच चर्चा,
सारे फोल बनवते!

जाताना सोडून हा लोक
कोणी शेजारी नसते!
जाताना सोडून लोकं
एकटी चिता भडभडते...

उजाडून लाखो घरटी...
शून्य अंधार पोकळी
सर्वत्र भरुनी उरते,
"सावध हाका, पुढल्या वाटा"
बंद मंदिरातली
घंटा किणकिणते...
आणि पृथ्वी, व्योम
दणाणून जाते...!

**२१.०४.२०२१ वाई**

# नाते

परस्परांशी तोडुनी नाते
"आम्ही आनंदी",बोलू खोटे!

समोर नाही,भास सारखे!
स्वप्नी तुझीच प्रीती भेटे!

फांदीवरती चंद्र टेकला
तू बसल्याचा भास वाटे!

सांगून मजला सांज जाते,
ल्याला तू कुठला साज, ते!

निरोप देता, तू वल्गना करते-
या विश्वाशी लढीन एकटे!

जातो काळ, जरी सरतच नाही..
दोघां एकटेपण खाण्यास उठे!

भिन्न दिशांना देह, जरी मनचक्षू
तिच्याच वाटेकडे, होऊन ओले, मोठे!

जाणीव दोघांना एकदाची होते,
जीवन परस्परांच्यासाठीच होते!

वाहून अश्रू, नजर भेटे!
पटली खूण, आनंदा पूर लोटे!

**१९.०३.२०२० वाई**

# असे कसे होते

दोघांमध्ये आपल्या
असे कसे होते
माझी होते हार अन्
जीत तुझी होते ||ध्रु||

चालत असता एकट्याने
जीवनाची वाट
हळूच आलीस सोबत
हाती देऊन हात
रुक्ष जीवनाचे तेव्हा
धुंद गीत होते || १ ||

प्रवास दोघांचा बने
आनंदाचे गाणे
गंधार धैवताचे
सुंदर मधुर तराणे
एका सुरात गाता
जुनी द्वंद्वगीते || २ ||

चुकलो जरी कधी मी
अधूनमधून कोठे
सांभाळून घेतेस
मन करून मोठे!
हीच तुझी अदा
मन जिंकून घेते || ३||

पाहतो तुझ्यामध्येच
"खरा मित्र", राणी!
देशी चांगल्यास पाठिंबा,
घालशी चुकांवरी पाणी!
अर्पिले हे हृदय तुझ्यावर,
होऊन ग रीते || ४ ||

**२०१९. वाई**

# तू - मी

तू पाहिले
मी पाहिले
डोळ्यांत दोघांच्या
कसले इशारे?

तू आणले
मी आणले
एकमेकांकरिता
प्रेमाचे नजराणे

तू साहीली
मी साहिली
विरहातल्या रात्रींची
जागवणारी काहीली

तू गायली
मी गायली
गाणी आयुष्याची
अस्ताईवरच राहिली

मी मोकळा
तू मोकळी
गर्दरानी, नदी किनारी
तुझ्यावर प्रेमाच्या लक्ष ओंजळी

तुझ्या अंगावर, माझ्या अंगावर
काटे, शहारे आणि थरथर!
सप्तरंगी स्पर्शाची उधळण
जेंव्हा अंगांगावर!

मी ऐकली, तू गायली
प्रणयाची गाणी!
रात्रभर स्तब्ध गात्रे न्हायली,
दवभार सुखाचे पाणी!

तू जागली,
मी जागली,
रात्र चांदण्याची,
गात्रे भागली!

तुला आली, मला आली - जाग,
कळ्यांची फुले झाली!
फळाची आस आणि पालवी -
लाज किरणात चूर झाली!

**२७.०१.२००२ आंबोली घाट**

# श्रावणसरी

गाण्यात तान
सुखात कान
सूरात बाण
उरात रान
पूरात पान
वाहून सान
गेले लांब
जरा थांब
क्षणी धुंद
क्षणी मंद
नाही बांध
धो-धो बरसात
वाहून खूप वेळ
स्वच्छ उघडीप
आता मेळ
निर्धास्त किरणांची तिरीप
पुन्हां तासाभरात
सुरू रिपरिप
उन्हं, पाऊस
नको जाऊस
पिसाट मना
नको जाऊस

हुंदडत रानोमाळ
खडकाळ गिरिदरी
बरसणार सांज-सकाळी
ओढाळ श्रावण सरी!!

**०१.०२.२००२ शिरोडा, सिंधुदुर्ग**

# उतरले नभांचे ओझे

उतरले नभांचे ओझे
कौलावर ताशा वाजे
साचले थेंब केसांवर
मुद्गंधा मोगरी लाजे

मल्हार बरसून सतार
भिजली एकेक तार
हे सचैल स्नान सुरांचे
मेहफिल अनोखी गाजे

धरणीच्या कणाकणांतून
एकेक कोंब हा जागे
सर करून निळाई नभाची
हिरवाई बनली 'राजे'

ममतेचा पान्हा फुटूनी
मृण्मयी शांत विराजे
हिरव्या शालीची मखमल
तव अंगावरती साजे

तीही नुकतीच झाली आरक्त
ओठांवर थरथरते जे
अनुरागाच्या वेलीवर
उमलले फूल हे ताजे

चिंबचुंबन धरा-मेघांचे
पाहून भावना रुजे
मिठीमध्ये खोल शिरूनी
लाजही मनामध्ये लाजे...!

**२७.०७.२००१ सावंतवाडी**

## सर सरतच नाही

सर सरतच नाही
सर सरतच नाही
जरा ठरतच नाही
ओल्या मेघांच्या पापण्या
धार झरतच राही

आज श्रावण सरीला
काही सुचतच नाही
नाही साजण साथीला
काही रुचतच नाही...

किती ओला, तरी स्मृतींचा
ओंडका जळतच राही
एक एक अग्निकण -
धग छळतच राही...

एक एक सौदामिनी
मनी चमकत जाई
दिपवून डोळे माझे
पुन्हा तळपत राही

ढग पाण्यानी भरला
सदा गडगडत राही
आभाळाचे बालगीत
तोही बडबडत गाई

सरी नको बरसू ग
तुला समजत नाही
तू थांब ना थोडीशी
कशी दमतच नाही?

कोण गातोय मल्हार
तू ग ऐकतच नाही
केली शेकोटी उबेची
उब साजण सयीची ---

अंगलट गारव्याला
आता धजतच नाही....
आता धजतच नाही!

**२७.०७.२००१ सावंतवाडी**

## धृतराष्ट्र

राज्य ह्यांच्यावर करी
सदा लावलेला कौल
पूर्वजन्मीचे कर्तृत्व
ठरवी पराजय किंवा डौल

नवी शताब्दी वा सहस्रक
त्यांना सारे निरर्थक
हे फक्त जागरूक
जेंव्हा मृत्यूची तिथी आणि जन्माची तारीख

सारे नजरेचे खेळ
अथवा पापाचेच फळ
त्याच्या सामर्थ्यापुढे काय
क्षुद्र मानवाचे बळ?

सारी ईश्वरीच इच्छा
काय सांगता हो येते?
त्याच्या इच्छेपुढे सांगा
काय कोणाचे चालते?

आली समाज मनाला
अशी भोवळ, मरगळ!
कोण उपसू शकेल,
सहस्त्र वर्षांचा हा गाळ?

पट्टी बांधून डोळ्यांना
असे गांधारी, अंध धृतराष्ट्र,
त्यांची कोटी कोटी मुले,
कसे अंध झाले राष्ट्र!

पट्टी सोडण्या तयांची
हवा अवतार कलंकी,
नाशवी अघोरी श्रद्धा
आणि अज्ञानाला जिंकी!!

**३०.०७.२००१ शिरोडा, सिंधुदुर्ग.**
**पूर्वप्रसिद्धि : दै. पुढारी १६.०२.२००३**

# पडलो दूरदेशी

पडलो दूरदेशी
दूर लांबले क्षितिज
कसा पडलोय फ़शी
कुठे रुजलेय बीज

पडलो दूरदेशी
दाट झाकोळले आभाळ..
धो धो जीवनाच्या राशी-
रेषा पुसती स्वच्छ कपाळ!

पडलो दूरदेशी
झालो प्रवाह पतित..
स्मृती गोठवावी कशी?
स्वर्णभारी ते अतीत!

पडुनी दूरदेशी
झालो सावळा वासुदेव
किंवा छान दरवेशी ...
नाही कसलीच ठेव!

पडलो दूरदेशी
इथली लोकच आगळी
मिठी क्षणात घट्टशी
नाती क्षणात वेगळी!

पडलो दूरदेशी
होता माझाच निर्णय
नको पाडू आता फशी
देवा बनवी निर्भय!!

**१२.०३.२००२ सावंतवाडी**

# झड शब्दांची

भुरभुरत्या पावसात
लागली शब्दांची झड
मनातल्या सावळ्या गोंधळाची
बाहेर पडायला
सुरूच तडफड
शब्दांच्या हिरकणी बुरुजांवरुन
करून धडपड
कधी टकमक टोकावरून
खोल दरीत पडझड
क्षणात क्षुब्ध, क्षणात लुब्ध
डोके झाले जड
वाटते जगाच्या
एका ध्रुवावर
कोणी नाही घेत कड
सरली सर, नुरली ओरड....

पुन्हा भुकेल्या मनाला
नव्याने मिळाली सवड!
पुन्हा क्षुब्ध, लुब्ध, मुग्ध, तृप्त
जुन्याच भावनांचा
नवीन रंगला फड!
नवीन रंगला फड!!

**०४.०८.२००१ सावंतवाडी**

# भेट

तुझ्या माझ्या भेटीचे
सुटत नाही कोडे
उभ्या-आडव्या वळणावर
प्रेमाचा नवा शब्द घडे!

तुझे भेटणे आणि
बोलणे... अगदी थोडे
आकाशात पिसाट फिरती
मन पक्षी वेडे ...

बाहुंचा ध्यास आणि
जन्माची आस
वेगात धुंद दौडती
श्वासांचे घोडे!

आगळा संवाद!
सुवासही आगळा!
आगळेच शब्द आणि उच्चार
आगळ्याच भाषेची किमया घडे!

श्वासांचा वेग
प्रेमाची मालिका जोडे
सुरेल झिणझिण,तुझ्याकडे
मन बेफाम ओढे!

भांबावलेले, भारावलेले
मन पर्वताचे कडे
थरथरणाऱ्या तुझ्यावर
भरभरून प्रेमाचे तुषार, शिंतोडे!

तुझ्या प्रत्येक भेटीत
मन-प्रपात होती खडे
अनुबंध इतका बेधुंद
सदा जनरीत तोडे!

असे आगळे कोडे
सोडवण्याचा छंद जडे...
हरवून कोड्यात पुन्हा...
नवी श्रावणसर झडे!!!

**२७.०७.२००१ शिरोडा, सिंधुदुर्ग**

## मन घनातले मेघ

सरी दारी बरसती
स्वर ऊरी पसरती
झाली आषाढमेघांना
कशी आज उपरती
सुरू कौलावर नगारा
दारी पागोळ्या गळती

अर्णवास ये उधाण
तटी भीषण भरती
आनंदाच्या वादळात
नावा कागदी तरती

पाणंदीची लाल वाट
कशी भिजून लाजती
सरी ओसरल्या तरी
पाने तिला भिजविती

टपटपती डोळ्यात
आनंदाची ही भरती
धुंद मनाच्या घोड्याला
नुरे कसलीच क्षिती

भावनांचे ते कल्लोळ
मग मनी उमटती
सर प्रेमाची बरसून
मनघनातले मेघ
दूर आकाशी सरती
दूर आकाशी सरती

**१९.०५.२००१ सावंतवाडी**

**पूर्व प्रसिद्धी : पाक्षिक " संवाद " ०७.०९.२००१**

# ते क्षण

गुलाबी गौरव ओठातून
मुक्त हासलीस जेंव्हा
ओंजळी भरून चांदणे
सांडलेस तेंव्हा

मुग्ध लुब्ध डोळयांनी
भारावून पाहिलेस जेंव्हा
घायाळाला आणखी
घायाळ केलेस तेंव्हा

आणि मग दिलास अलगद
नाजूक हात हाती!
घायाळ वनांचे धुंद पक्षी
चौफेर उडून जाती!

पुढील रोमहर्षक स्मरण यात्रा
गोड शिरशिरी अद्याप गात्रा!

पण आता सोबतीला असते
चित्रातील तुझी छाया...
अनुरागाच्या आठवणी आठवत आठवत
शब्द खजिने मी घालवतो वाया!

**२०.०४.१९९४ मुंबई**
**पूर्व प्रसिद्धी : दै. पुढारी सातारा २३.०३.२००३**

# चाहूल

तुझ्या मनात
 माझ्या तनात
साऱ्या जनात
घनगर्द रानात

उठलय काहूर
कसली चाहूल
कसली हुरहुर
 भरलंय ऊर
 देशी दूर!

जाऊन रानात
हिरव्या वनांत
हिरव्या मनांत!
 सांगतो गुपित
बुजऱ्या कानात!

भरून उरलेल्या
गायीच्या स्तनांत
तुडुंब साचलेल्या

भावना मनात
लागली चोच
भळभळ क्षणांत
वाहून भावना
शिरशिरी तनात
मोहरल्या मनात

अविरत निनाद
घंटा शंखांचे
शरीरी पडसाद
तुझी साद
माझा प्रतिसाद
आगळा उन्माद

झिणझिण मनांत
झिणझिण तनांत
साऱ्या जनांत
घनगर्द रानांत
दूरच्या सूरांत
भरल्या उरांत
भरभरुन वाहत
डोळे भरून पाहत

वाहतात पाट
मिळाली वाट
वाहिली रात
आनंदी पुरात
धुंदल्या क्षणांत
भिजली निवांत
काहिली शांत

आगळी आस
तुझ्या तनांत
माझ्या मनांत
साऱ्या जनांत
घनगर्द रानांत

कसली चाहूल!
कसली हुरहुर ...

उठणार नवा सूर!
आनंदाचा महापूर!!
नेणार देशी दूर!!!

**०२.११.२००१ शिरोडा, सिंधुदुर्ग**

# गीत सुखाचे

फुलपाखरू मनाचे झाले वेडे
आणि स्वच्छंदी आकाशी उडुनी गेले || ध्रु ||

झाला विहार काही क्षणांचा
पडला पाऊस रंग कणांचा
वर्षावात त्या भिजूनी गेले ||१||

सुटली चिंता ती अंताची
मोडली सारंगी ती खंतांची
बदसूर ते कोठे विरुनी गेले ||२||

आस ना सुटे जीवनाची
साखळी ही सुख युगायुगांची
स्वप्न साखरेत हे विरघळूनी गेले ||३||

**२८.०२.१९९३ मुंबई.**

# फ्लॉपी

साठवून घेतो मी मनाच्या फ्लॉपीत -
आपल्या सहवासाचा क्षणक्षण!
पासवर्ड देऊन बिनधास्त गुपीत,
ठेवतो मनाच्या साडेतीन इंच कुपीत!

कधी एकांतात तुझ्या मनाच्या
हँग झालेला मनाचा पीसी,
तुझ्या ' जाळयात ' पुरते अडकून,
माझे मन हे हरवून बसतो!

वेबसाइट्सच्या वेगवेगळया आयकॉन प्रमाणे,
तुझ्या चेहऱ्याच्या बदलत्या छटा,
नेमका क्षण पकडला तर हलती,
इंद्रधनुषी मनाच्या बटा!

कधी कधी मध्येच घाईगर्दीत,
कधी भरल्या हृदयाच्या वरच्या -
रिकाम्या खिशाच्या चिंतेत,
फ्लॉपी टाकून खिशात,
पासवर्ड विसरीत,

टाकतो पावले..
विचारांच्या खोल गर्तेत ...
दिवसभराच्या जगण्याच्या धडपडीत,
हँग झालेला मनाचा पीसी,
अंथरुणावर डोळे मिटताच ऑन होतो आणि......
आणि सावरते त्या दिव्य क्षणात पुन्हा,
पुन्हा तुझ्या स्मृतींचे प्रेमळ गुपित!
ओठांवर पासवर्ड येतो आणि
तुझ्या ओठांचे तुषार सिंचित...
अवतरतेस फ्लॉपीतून प्रत्यक्ष..
मी स्तिमित!!!

नको आठवणी तुझ्या तुला फ्लॉपीत
आणि स्मृतींच्या जाळयात
हवीस तू प्रत्यक्ष मिठीत
(आता ) पासवर्ड टपोऱ्या डोळयात ...!
प्रेमाचे चंद्र घनगर्द तळयात...!

**१३.११.२००१ शिरोडा, सिंधुदुर्ग**

# पुन्हा बरसली सर

कळले नाही पहाट झाली
मिठी पुन्हा ती घट्ट झाली
धुक्यात लपली वाट उषेची
चुंबून पापणी मिट्ट झाली

शहारल्या तनुला बहार आली
एक वीजेची लहर निघाली
पुन्हा बरसली सर प्रेमाची
अंगोअंगी तुषार प्याली

कुशीत तुझीया ऊब मिळाली
मिठीत तुझीया नीज निमाली
चंद्र तनुचे तळपून उठले
आकांक्षा मम तृप्त जाहली

**३१.०८.२००१ सावंतवाडी**

## अतृप्त

तुझ्या मिठीची तहान
नाही शमली अजून
दिसता तू मनपाखरे, चकोराप्रमाणे -
ऊंच आकाशात ' आ ' वासून!
समजून तुला चंद्राचे चांदणे,
काठोकाठ मनाचे प्याले,
तृषार्त मनाने आकंठ पिऊन...
कशी भूल...नाही होश...
पुरता बेहोश....
थेंब थेंब तनामनात रीचून...
गायील्यास किती सुरेख गजला,
शमा जरी गेली कधीच विझून!

अनंत भोग.. तरीही नाही योग -
संपूर्ण मनोमिलनाचा
किती पिऊनही थोडा रिता..
प्याला आमच्या सहजीवनाचा!

की हे उगीचच, लाड बादशाही?
नाही मना समाधान, स्वर्गातही!
अस्वस्थ मनाला, मिठी कवितेची
म्हणून उघडून बसलो वही .....!!!

**२१.११.२००१ शिरोडा, सिंधुदुर्ग**

कवितेच्या सिंचनधारांनी
मायमराठी फ़ुलते फ़ळते
इथे लाभती शब्दकळांना
शब्दकळयांची सुगंधगीते

खुपखुप सुंदर सुंदर कविता वाचण्यासाठी

www.esahity.com



# शुभेच्छा !

मनात रुंजी घालणाऱ्या कवितांचा गुच्छ घेऊन डॉ. सुनील रामकृष्ण देशपांडे रसिकांच्या भेटीस येत आहेत, त्यांना शुभेच्छा देण्यासाठी एक कवी व काव्यरसिक म्हणून हा शब्दप्रपंच !

कविता हे खरेतर पूर्ण वेळचे जगणे असते. त्या निर्मितीमागे संवेदनांचे साधना असते. वाचन मननाची एक गंभीर व दीर्घ वाटचाल असते. रुंजी या हौसेने पण मनापासून केलेल्या कविता आहेत. "चिंब सरीत भिजतांना" मधील संवेदना , "लहर" मधील उत्कट ओढ , "श्रावण" हायकूमधील शब्दचित्रे, "उर्मी" मधील उलघाल दाद द्यावी येईल इतके तरल आहे.

कवितेची उत्कट परंपरा व आशिर्वाद लाभलेल्या डॉ. सुनील यांना रुंजी संग्रहाबद्दल शुभेच्छा !

**प्रवीण दवणे**

**सुप्रसिद्ध कवी, लेखक, गीतकार आणि वक्ते**